महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# उत्तर अमेरिकेतील मराठी संस्कृतीची नाळ - भाग २

21 Feb 2012, 2108 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांबरोबरच येथील मराठी प्रेमी मंडळींनी आपापले व्यवसाय आणि नोक - या सांभाळून साहित्यिक बंध जोडून ठेवण्याचे तसेच , सामाजिक बांधिलकीचे व्रतही चालू ठेवले आहे . वृत्तपत्र , मासिके , दिवाळी अंक , कथा संग्रह , कविता संग्रह , कादंब - या , नाटके प्रसिद्ध करून साहित्याची दिंडी उत्तर अमेरिकेत गाजवत ठेवली आहे .

शिकागोच्या मराठी मंडळातर्फे उत्तर अमेरिकेतील पहिले वृत्तपत्र , ' बृहन महाराष्ट्र मंडळ वृत्तपत्र ' १९८० साली सुरु झाले . त्यागोदर मराठी शिकॅगोकारांनी १९६९ साली ' रचना ' हे पहिले हस्तलिखित लिहिले . टोरोन्टोच्या मराठी मित्र मंडळींनी १९७७ च्या दरम्यान ' स्नेहबंध ' हे हस्तलिखित श्री . विनायक गोखले ह्यांच्या संपादनाखाली सुरु केले होते आणि नंतर १९७८ च्या दिवाळीला अमेरिकेतील आणि कॅनडातील हौशी मराठी साहित्यिक - प्रेमी एकत्र येऊन त्यांनी ' एकता ' ह्या त्रैमासिकाची मुहूर्तमेढ बसवली ती आजमितीपर्यंत गेली ३३ वर्षे यशस्वीपणे सांभाळत आले आहेत . स्नेह , रंगदीप , अभिरुची , सावली हे दर्जेदार दिवाळी अंक उत्तर अमेरिकेतील हौशी आणि महाराष्ट्रातील प्रथितयश लेखकांच्यासाहित्यकृतीने सजवलेले असत .

उत्तर अमेरिकेतील माझ्या माहिती प्रमाणे किमान ८० लेखक / कवींनी आपले साहित्य महाराष्ट्रातील ग्रंथाली , म्याजेस्टिक , राजहंस , अमोल , अशा नामवंत प्रकाशनांमार्फत प्रसिद्ध केले आहे . त्यातील ४० निवडक साहित्यिकांची माहिती , त्यांच्या फोटो व साहित्य नमुन्यासहित ' मायबोलीचा विश्वसेतू ' च्या दोन भागांमध्ये गेल्या वर्षीच प्रसिद्ध झाली आहे . ह्या पुस्तकांच्या प्रकाशनाचा सोहोळा जानेवारी २२ , २०११ ला पुण्यातील महाराष्ट्र परिषदेच्या हॉल मध्ये झाला .

' ह्युस्टन ', टेक्सास येथील मुख्य संपादक दिवाकर तथा दादा कारखानीस , आणि सहसंपादक फिलाडेल्फियाच्या सौ . मोनाली फाटक आणि कॅलिफोर्नियाचे प्रमोद तेंडुलकर ह्यांच्या अथक परिश्रमाने हा गौरव ग्रंथ प्रसिद्ध केला गेला . त्याच बरोबर मागच्या जुलै महिन्यात झालेल्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात जवळ जवळ २० लेखकांनी प्रसिद्ध केलेल्या वेगवेगळया विषयावरील पुस्तकांचा प्रकाशन सोहोळा आणि गौरव , रत्नाकर मतकरी ह्यांच्या हस्ते झाला . कॅलिफोर्नियातील सौ . विद्या हर्डीकर - सप्रे ह्यांनी जुलै २०११ ला ' संवादने ' हे अमेरिकेतील मराठी लोकांबद्दल पुस्तक ' ग्रंथाली ' तर्फे प्रकाशित केले आहे . ह्या पुस्तकात विद्याताईंनी त्यांनी केलेल्या उपक्रमात आलेले अनुभव कथन केले आहेत . हे पुस्तक मुंबईत उपलब्ध आहे आणि इच्छुकांनी जरूर वाचावे .

गेल्या दशकात ई - जगात फार वेगाने बदल घडत गेले . पर्यावरणाच्या निर्बंधांमुळे कागदाचा कमीत कमी वापर कसा होईल आणि धावत्या जीवनात माणसाचा कमीत कमी वेळ कसा लागेल ह्याकडे सध्या कटाक्ष असतो आणि त्यातूनच संगणकावर नियतकालिके , वृत्तपत्रे ह्यांच्या संकेत - स्थळांचा उगम झाला . न्यू जर्सीच्या सुहास पै यांचे ' अंतराळ डॉट कॉम ', मंदार जोगळेकर ह्यांचे ' ग्लोबल मराठी न्यूजलेटर डॉट कॉम ', ' ई - बुकगंगा डॉट कॉम ' अशासारखी संकेत स्थळे ( वेबसाईट्स ) सुरु झाली आहेत .

विद्या हर्डीकर ह्यांच्या कल्पनेतून साकारलेले एक हौशी मराठी साहित्यिकांचे कौटुंबिक स्वरूपाचे छोटे साहित्यिक मंडळ , ल . मा . ल . (Los Angeles Marathi Literature) काही वर्षापूर्वी लॉस एंजलीस परिसरात सुरु झाले . १० - १२ जण कोणाच्या तरी एका घरी दर दोन महिन्याआड जमतात , एखादा विषय निवडून

त्यावर कविता , लेख अशा प्रकारची साहित्यकृती निर्माण करून आपली मराठी साहित्याची हौस भागवतात केवळ मराठीच्या आवडीमुळे . आपला अमूल्य वेळ खर्च करून अशा प्रकारचे उपक्रम येथील उत्तर अमेरिकेतील बहुतेक प्रमुख शहरात केले जातात .

विवाहेच्छू मराठी मुला - मुलींसाठी न्यू जर्सीच्याच सौ . सविता गोखले गेली कित्येक वर्षे विवाह मंडळ चालवत आहेत . मंदार जोगळेकरांनी ‘ मधुमिलन डॉट कॉम ’ हे संकेत - स्थळ ( वेब साईट ) गेल्या वर्षी सुरु केले आहे . संगणकावर मराठी अक्षरमुद्रा ( फोंट ) देखील येथेच जन्मली . मिशिगनचे डॉ . माधव देशपांडे , कॅनडातील प्रा . डॉ . अशोक अकलूजकर आणि कॅलिफोर्नियाचे श्रीकृष्ण पाटील ह्या जेष्ठ व्यक्तींनी ब - याच वर्षांपूर्वी , जेव्हां संगणकाच्या युगाची नुकतीच सुरुवात केली होती .

शहरा शहरातून बाल - विहार सुरु झाले . त्यात पाच सहा वर्षांच्या मुलांपासून ते पंधरा सोळा वर्षांची मुले भाग घेतात . शनिवार , रविवारच्या ह्या सकाळच्या दोन तासाच्या बाल - विहारातून मुलांना मराठी / इंग्रजी मधून भगवदगीतेचे अध्याय वाचून त्यांचा सुलभ अर्थ समजावून सांगतात , हिंदू सणांची माहिती देतात . या शिवाय लहान मुलांचे वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम बसवले जाऊन , गणपती / दिवाळी सारख्या समारंभातून ते सादर केले जातात . चार वर्षापूर्वी लॉस एंजलीस परिसरात लॉस एंजलीसच्या मराठी मंडळातर्फे वेगवेगळया ठिकाणी मराठी शाळा सुरु केल्या गेल्या . येथील मराठी कुटुंबे एकमेकांपासून सर्वसाधारणपणे अर्ध्या - पाऊण तासाच्या अंतरावर असतात .

इच्छुक पालक आपल्या मुलांना शनिवार किंवा रविवारी घेऊन जातात . ही शाळा बहुतेक वेळा एका मराठी कुटुंबाच्या घरी किंवा गावातील वाचनालयातील एका खोलीतही भरली जाते , तर कधी जवळच्या हिंदू देवळातही . बहुतेक मराठी मंडळांतर्फे मराठी पुस्तकांचे वाचनालयहि चालवले जाते . स्वयंस्फूर्तीने असे सेवक आपापले व्यवसाय , नोकरी सांभाळून फावल्या वेळात मराठीसाठी , येथील मराठी लोकांसाठी काही ना काही तरी धडपड करत असतात . त्यात ना पैशाची हांव , की प्रसिद्धीचा सोस . हे सर्व ते मराठीच्या प्रेमापोटी करत असतात .

सामाजिक बांधिलकीचे व्रतही काहींच्या अंगी बाणलेले असते . यशवंत कानेटकर ह्यांनी इतर सहाध्यायांसमवेत स्थापन केलेली ' महाराष्ट्र फौन्डेशन ' ही महाराष्ट्रातील सेवाभावी संस्थांना मदत करण्यासाठी संस्था काढली , कॅनडाचे , जगन्नाथ वाणी ह्यांनी स्थापन केलेली ‘ महाराष्ट्र सेवा समिती ’, कॅलिफोर्नियातील विद्या हर्डीकर आणि वामन / अनुराधा गानू ह्यांनी सुरु केलेली दत्तक खेडे योजना , अशा वेगवेगळया सामाजिक संस्था केवळ सेवाभावी वृत्तीने महाराष्ट्रातील गावांच्या विकासाच्या ध्यासाने काढल्या . सुनील देशमुख ह्यांनी महाराष्ट्र फौंडेशनला एक कोटी रुपयांची देणगी दिली व त्यातून दरवर्षी महाराष्ट्रातील मराठी साहित्यिकाला पुरस्कार दिला जातो . पु . ल ., विंदा ह्यासारख्या जुन्या साहित्यिकांपासून ते प्रज्ञा लोखंडे सारखे नवोदित तरुण साहित्यिकही त्याचे मानकरी झाले आहेत . देशमुखांप्रमाणे , डॉ . अनंत लाभसेटवार ह्यांनीही महाराष्ट्रातील मराठी जनतेसाठी उदारतेने भरघोस कार्य केले आहे . आपला वेळ , स्वत : चे पैसे खर्च करून ह्या लष्करच्या भाक - या भाजण्याचा प्रयास केला तो केवळ सामाजिक बांधीलकीनेच . ज्या गावांचा विकास करायचा , त्या गावातील कार्यकारी समितीतील व्यक्तीही नि : स्पृहपणे , निधीचा विनियोग योग्य रीतीने विकासासाठी करतात की नाही यावरही त्यांचे नियंत्रण आणि बारकाईने लक्ष असते .

माझ्या निवडक माहितीनुसार वरील लेख लिहिण्याचा प्रपंच केला आहे . अजूनही ब - याच व्यक्ती आणि उपक्रम आहेत की ज्यांनी मराठी अस्मिता जोपासण्यासाठी असे सामाजिक , सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्य केले आहे . सध्याच्या वर्तमान पत्रातील बातम्या वाचतांना , दूर - दर्शन वरील बातम्या , चर्चा - सत्र ऐकतांना , मराठी मालिका पाहतांना , मराठीतील साधे सोपे शब्द लोप होत चालले आहेत असे पावलोपावली जाणवते आणि त्याचीच फार खंत राहून लागली आहे . येत्या दहा - पंधरा वर्षांत मराठीतील फक्त कर्ता आणि क्रियापदच

राहील , बाकीचे सर्व शब्द इंग्रजीतील असतील , असे वाटू लागले आहे . हे वेळीच रोखले पाहिजे नाही तर मराठी , मराठी न रहाता ती निश्चितच संपूर्ण मंग्लीश होऊन जाईल .

प्रमोद तेंडुलकर
रिव्हरसाईड , कॅलिफोर्निया